आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२६ जुलै २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- कारगिलमध्ये आपण केवळ युद्धच जिंकलं नसून सत्य, संयम, सामर्थ्याचं उदाहरण जगापुढं ठेवलं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांशी जागावाटपाची चर्चा करण्याकरता काँग्रेसकडून १० जणांची समिती स्थापन
- महिलांच्या आशिया चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत बांगला देशावर १० गडी राखून मात करत भारताची अंतिम फेरीत धडक

**आणि**

- शेअर बाजारात सलग पाच सत्रांमधली घसरण थांबवत, सेन्सेक्सची १ हजार २९३ अंकांची उसळी, निफ्टीचा नव्या उच्चांकाला स्पर्श

**<><><><><>**

कारगिलमध्ये आपण केवळ युद्ध जिंकलं नाही, तर सत्य, संयम आणि सामर्थ्याचं अतुलनीय उदाहरण जगापुढे ठेवलं असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. २५ व्या कारगिल विजय दिना निमित्त, प्रधानमंत्री मोदी यांनी आज लडाख मधल्या कारगिल युद्ध स्मारकाला भेट दिली. आणि कारगिल युद्धात कर्तव्य बजावताना सर्वोच्च बलिदान देणाऱ्या जवानांना आदरांजली वाहिली, त्यावेळी ते बोलत होते. कारगिल युद्धात असत्य आणि दहशतीला, सत्यापुढे हार पत्करावी लागल्याचं ते म्हणाले. प्रधानमंत्र्यांंनी आज दूरस्थ पद्धतीनं लडाख मधल्या शिंकुन-ला बोगदा प्रकल्पाचा पहिला सुरुंग स्फोटही केला.

**राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू यांनी कारगिल विजय दिनानिमित्त देशाच्या सशस्त्र बलांप्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे आणि त्यांना आदरांजली वाहिली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार, केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासह अनेक मान्यवरांनी आज कारगिल विजय दिनानिमित्त

कारगिल युद्धात आपल्या प्राणांची बाजी लावणाऱ्या शूर सैनिकांना अभिवादन केलं आहे.

<><><><><>

संसदेच्या दोन्ही सभागृहात आज कामकाजाची सुरुवात कारगिलमधल्या शहीदांना आदरांजली अर्पण करून झाली. गेल्या सहा वर्षात १६ कोटी ८३ लाख नवीन रोजगार निर्माण झाल्याची माहिती कामगार आणि रोजगार राज्यमंत्री शोभा करंदलाजे यांनी आज संसदेत दिली. या ६ वर्षांच्या कालावधीत देशात एकूण रोजगारामध्ये ३५ टक्के वाढ झाली असल्याचं त्यांनी राज्यसभेत लेखी उत्तरात सांगितलं. लोकसभा आणि राज्यसभेत आजही अर्थसंकल्पावर चर्चा झाली.

<><><><><>

महाविकास आघाडीतल्या घटक पक्षांशी जागावाटपाची चर्चा करण्याकरता काँग्रेसनं १० जणांची समिती स्थापन केली आहे. महाराष्ट्रातल्या जागावाटपाची चर्चा नाना पटोले, बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार, पृथ्वीराज चव्हाण, नितीन राऊत, आरिफ खान, सतेज पाटील करणार आहेत. वर्षा गायकवाड, भाई जगताप आणि अस्लम शेख मुंबईतल्या जागा वाटपाच्या चर्चेत सहभागी होतील.

<><><><><>

**पुण्यात** काल अतिवृष्टीमुळे पसरलेला चिखल आणि गाळ यांच्या सफाईसाठी खाजगी कंपन्यांच्या मदतीने युद्धपातळीवर स्वच्छता मोहीम राबवण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. तसंच पुरामुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. पाटबंधारे विभागाचे अधिकारी आणि महापालिका यांच्यातल्या समन्वयाअभावी कालची पूरपरिस्थिती उद्भवली. यापुढे प्रशासन तसंच अधिकाऱ्यांनी समन्वय साधण्याची काळजी घ्यावी, असे निर्देश केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी शासकीय विश्रामगृहात आयोजित आढावा बैठकीत दिले. खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदी पात्रामध्ये

सुरू असणारा विसर्ग दुपारी पुर्णपणे बंद करण्यात आला. मात्र आवश्यकता भासल्यास धरणातून पुन्हा विसर्ग करण्यात येईल अशी माहिती खडकवासला पाटबंधारे विभागानं दिली आहे.

**धुळे** जिल्ह्याच्या साक्री तालुक्यातल्या कान नदीवरचं मालनगाव मध्यम प्रकल्प पावसामुळे शंभर टक्के भरला आहे. कान नदीकाठच्या नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी असे आवाहन पाटबंधारे विभागाने केलं आहे.

कृष्णा आणि वारणा नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. त्यामुळे **सांगली, मिरज** शहरासह ग्रामीण भागातल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. नदीकाठच्या नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**सांगली** जिल्ह्यात पूरपरिस्थिती हाताळण्यासाठी शंभर जणांचं लष्करी पथक तैनात करण्यात आलं आहे. या पथकात प्रत्यक्ष सैनिकांसोबतच वैद्यकीय तसंच अभियांत्रिकी कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

**कोल्हापूर** जिल्ह्यातले ११ राज्य महामार्ग आणि ३७ प्रमुख जिल्हा मार्ग असे एकूण ४८ रस्ते अतिवृष्टीमुळे वाहतूकीसाठी बंद आहेत अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. गेल्या २४ तासात झालेल्या पावसाने पंचगंगेची पाणीपातळी दीड फुटांनी वाढून शेकडो गावांचा जिल्ह्याशी संपर्क तुटला आहे. कोल्हापूर शहरातही पुराचे पाणी शिरले आहे.

**गडचिरोली** जिल्ह्यात आज अधूनमधून पावसाची रिपरिप सुरु होती. गोसेखुर्दमधून होणारा विसर्ग कमी केल्याने गडचिरोली-आरमोरी, गडचिरोली-चामोर्शी, गडचिरोली-मूल या प्रमुख मार्गावरील वाहतूक सुरु झाली आहे. मात्र, पर्लकोटा नदीला पूर आल्याने आलापल्ली-भामरागड आणि दिना नदीच्या पुरामुळे आष्टी-आलापल्ली या या मार्गांवरील वाहतूक बंद आहे. भामरागड तालुक्यात सर्वाधिक ८७ पूर्णांक ३ दशांश मिलिमीटर पाऊस पडला. त्याखालोखाल एटापल्ली तालुक्यात ६५ पूर्णांक २ दशांश मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

**गोंदिया** जिल्ह्यात अर्जुनी मोरगाव तालुक्यातलं इटीयाडोह धरण १०० टक्के भरलं आहे.

**नंदूरबार** जिल्ह्यातल्या नवापूर तालुक्यात झालेल्या पावसानं सुरत-भुसावळ रेल्वे मार्ग प्रभावित झाला आहे. त्यामुळं या मार्गावरच्या काही गाड्यांचे मार्ग बदलले असून उधना-नंदूरबार मेमो रद्द झाली आहे.

**नंदुरबार** जिल्ह्यात रंगावली, नेसू तसंच सरपणी नद्यांना पूर आला आहे.

**रायगड** जिल्ह्यात खवळलेल्या समुद्रामुळे अलिबागजवळ अडकलेल्या मालवाहू जहाजावरून चौदा कर्मचाऱ्यांची भारतीय तटरक्षक दलानं सुटका केली.

**मुंबई**त मात्र आज पावसानं विश्रांती घेतली. मोरबे धरण क्षेत्रात झालेल्या चांगल्या पावसामुळे धरणात ७४ टक्के पाणीसाठा भरला आहे. त्यामुळे नवी मुंबई महापालिकेने एका वेळच्या पाणीपुरवठ्यात केलेली कपात रद्द केली आहे.

**<><><><><>**

श्रीलंकेत सुरू असलेल्या महिलांच्या आशिया चषक टी-20 क्रिकेट स्पर्धेतच्या उपांत्य फेरीत भारतानं बांगला देशाचा १० गडी राखून पराभव केला आणि अंतिम फेरीत धडक मारली. या सामन्यात नाणेफेक जिंकून बांगलादेशानं प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. या संघाला निर्धारित २० षटकात ८ बाद ८० धावा करता आल्या. भारतीय संघाकडून रेणुका सिंग आणि राधा यादव यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले. भारतीय संघानं अवघ्या ११ षटकांत ८३ धावा करून बांगलादेशावर १० गडी राखून विजय मिळवला. भारताच्या सलामीवीर स्मृती मंधाना हिनं ३९ चेंडूत ५५ आणि शेफाली वर्मा हिनं २८ चेंडूत २६ धावा केल्या.

आजच्या दुसऱ्या सामन्यात श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. या सामन्यातल्या विजेत्या संघाची लढत २८ जुलै रोजी भारतासह होणार आहे.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकचा उद्घाटन सोहळा आज होत असून, भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री ११ वाजता पॅरिसमधल्या सीन नदीच्या किनाऱ्यावर या भव्य सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी आयोजित परेडमध्ये भारताचं नेतृत्व ऑलिम्पिक पदक विजेती बॅडमिंटनपटू पी व्ही सिंधू आणि टेबल टेनिस पटू शरथ कमल करणार आहेत.

<><><><><>

सलग पाच सत्रांमधल्या घसरणी नंतर शेअर बाजारात आज तेजीचा जोर राहिला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं आज तब्बल १ हजार २९३ अंकांची उसळी घेतली आणि तो ८१ हजार ३३३ अंकांवर बंद झाला.

बाजार बंद होण्यापूर्वी झालेल्या खरेदीमुळे राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टिनं आज २४ हजार ८६१ अंकांचा नवा उच्चांक नोंदवला. मात्र तो नंतर थोडा खाली आला, आणि दिवसअखेर ४२९ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार ८३५ अंकांवर बंद झाला.

धातू आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या समभागांनी आज सर्वात जास्त तेजी नोंदवली, तर वाहन उद्योग, फार्मा आणि बांधकाम क्षेत्रातले समभाग देखील आज तेजीत होते.

<><><><><>

राज्य सरकारच्या गुजराती आणि सिंधी साहित्य अकादमीचे पुरस्कार आज जाहीर झाले. गुजराती साहित्य अकादमीचा नर्मद पुरस्कार बाबा भांड आणि ईश्वरलाल परमार यांना जाहीर झाला. जन्मभूमी सौराष्ट्र ट्रस्ट, अक्षय अंताणी, ललिता पटेल आणि तारिणीबहेन देसाई यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर झालाय. अनुवादासाठीचा गोपाळराव विद्वांस पुरस्कार वैशाली त्रिवेदी यांना नटसम्राट या नाटकाच्या गुजराती भाषांतरासाठी जाहीर झाला आहे. एसएनडीटी विद्यापीठानं या

अनुवादाचं प्रकाशन केलं असून त्रिवेदी आकाशवाणी मुंबईत कार्यक्रम अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

सिंधी अकादमीचा अखिल भारतीय जीवन गौरव पुरस्कार नंदलाल छुगानी यांना जाहीर झाला आहे.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात अत्यंत जोरदार पाऊस पडला. विदर्भातही जोरदार पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकण, मराठवाडा आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्रात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.